REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# जागतिकीकरणात मराठी लोककलांचे स्थान

**डॉ. विजय अर्जुन रेवजे**
**लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय सोलापूर**

**गोषवारा :-**



आज मोबाईल, फेसबुक, फ्लॅट संस्कृती, बंद दाराची संस्कृती नव्याने उभी राहत आहे. नात्या नात्यातील संवाद हरवून गेले, मानसन्मान कमी झाला. मॉडर्न आई आज अंगाई गात नाही, पर्यायाने संस्कृतीची पायमल्ली होत आहे. 'जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सीमांचे विश्लेषण मोकळेपण, आजवर उभ्या केलेल्या अडथळयांचे विसर्जन सी. पं.खेर जागतिकीकरण म्हणजे दोन भिन्न देशातील संस्कृतींनी एकत्र येऊन आपल्याकडे जे उत्तम आहे. त्याची एकमेकात देवाण-घेवाण करणे. मोतीराम कटारे जागतिकीकरण म्हणजे बहुजन समाजाचे मरण, मधुकर वाकोडे सर्व प्रकारच्या प्रवाहांचे एकत्रिकरण म्हणजे जागतिकीकरण. विकीपीडिया याबाबतीत भालचंद्र नेमाडे म्हणतात, "जागतिकीकरणाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने वास्को द गामाच्या काळापासून जागतिकीकरण सुरू आहे." या जागतिकीकरणात मराठी लोककलांचे स्थान कसे आहे? याबाबत संशोधन करायचे आहे.

## प्रास्ताविक

लोककला माणसाच्या आदिम जाणिवेला जोडल्या असल्यामुळे कोणत्याही माणसाला आपल्या सांस्कृतिक पर्यावरणातील लोककलेबद्दल नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. कधी मनोरंजनाचा तर कधी धार्मिक कर्मकांडाचा आधार घेत लोककला समाजमनाचा भाग बनल्या आहेत. आज त्या नामशेष झाल्या किंवा त्यांची गरज संपली असे म्हणून माणसाच्या मनातून त्या महजपणे पार होणार नाहीत. माणसाच्या आदिम जाणिवेच्या अस्तित्त्वाला त्या मिडल्या असल्याने कोणत्याही गरिब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित अशा कोणत्याही वयोगटातील माणसाला लोककलांनी नेहमीच भुरळ पाडली आहे. आपल्या भूतकाळातल्या पाऊलखुणा माणसाला नेहमीच खुणावत आल्या आहेत. लोककला या गतेतिहासातील पाऊलखुणा असल्याने त्यांचे व्यवहारातील अस्तित्त्व संपले तरी माणसाच्या मनातील अस्तित्त्व संपणार नाही हेही तितकेच खरे आहे.

विसाव्या शतकातील प्रसिद्ध विचारवंत एरिक फॉर्म यांनी 'दि. सेन सोसायटी' या ग्रंथात लोककलांना कलेक्टिव आर्ट म्हटले आहे. माणसाच्या नैसर्गिक जगण्यातून सामुदायिक कलांची निर्मिती कशी होते याविषयी मूलभूत मांडणी फॉर्म यांनी केली आहे. कोणत्याही लोकसमूहाचा लोकाविष्कार हा त्या लोकसमूहाच्या प्रागतिक इतिहासाला दृष्टी देणारा असतो. लोककलांना याअर्थाने समजून घेतले पाहिजे. खरे तर लोककला म्हणजे मानवी समूहाने स्वतःशी आणि इतरांशी साधलेला तो

लोकसंवादच असतो. मनातल्या आणि बाहेरच्या जगाला स्वतःच्या इंद्रियांद्वारे अर्थपूर्ण निपुण सर्जनशील आणिले आणि भागीदारीसह प्रतिसाद देण्याला लोककलेत फार महत्व आहे. भारतातल्या वेगवेगळ्या राज्यांतल्या लोककला पाहिल्या की या लोककलावंतांनी ही सांस्कृतिक वैविध्यता किती समर्थपणे जपली आहे हे लक्षात येते. ग्रामीण अशिक्षित माणसाच्या भावविश्वाशी जोडुन त्याला चिंताग्रस्त आणि मनोरुग्णतेपासून दूर नेण्याचे काम लोककलांनी केलेच परंतु त्यांच्या मनातील श्रृंगार भावनेचा निचरा करून समाजाचे सामाजिक आरोग्य सांभाळण्याचे कामही लोककलांनी केले हेही नाकारता येत नाही . लोककला ग्राम्य आणि अश्लील असतात असा शिक्का मारून पांढरपेशी समाज लोककलांना जी नाके मुरडतो तेही कला म्हणून लोककलांवर अन्याय करणारे आहे.

महाराष्ट्रात 'तमाशा', 'जागरण-गोंधळ', 'दशावतार', 'ललित', 'भारूड', 'दंडार' इद्यादी लोककलांची मोठी समृद्ध परंपरा दिसते. उत्तरेकडे 'रामलीला', 'रासलीला', आंध्रप्रदेशात 'करकट्टम', 'कुचिपुडी', केरळमध्ये 'कथकली', राजस्थानच्या 'कठपुतली', 'घुमर', पंजाबचा 'भांगड़ा', आसाममधिल 'पिहू' तर हिमाचल मधिल 'गडवाली', छत्तीसगढमधिल 'नाचामंडल' या काही प्रमुख लोककला भारताच्या विविध राज्यात आपल्याला दिसतात. पण भारतात कुठेही गेलो तरी लोककला आणि लोककलावंतांची स्थिती चांगली दिसत नाही. एकीकडे चित्रपट नाटक आणि टीव्ही मालिकांची आर्थिक उलाढाल आणि ग्लॅमर तर दुसरीकडे लोककलावंत मात्र भिकेला लागले आहेत असे विरोधाभासी चित्र आपल्याला का दिसते याचा विचार करण्याची ही वेळ आली आहे.

लोककलांकडे शासन माध्यमे अभ्यासक, रसिक आणि कलावंत या सगळ्यांनीच आपल्याला मतलबापुरते पाहिल्यामुळे लोककलांचा कला म्हणून प्रवास खुंटीत झाला असे म्हणायला बराच वाव आहे. व्यवसाय आणि कला अशा दोन स्तरांवर लोककलांचा विचार केला तर वाढत्या बाजारूपणामुळे लोककला कला म्हणून किती उरल्या आणि व्यवसाय म्हणून कुठे निघाल्या आहेत असा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही.

भारतात कुठेही गेले तरी लोककलावंतांची अवस्था दयनीय झाल्याची दिसते. लोककलावंतांच्या माथी हे भिकारीपण कुणी लादले? लोककला आणि लोककलावंतांची प्रतिष्ठा कुणी नाकारली? त्यांचे सामाजिक न्यायाचे प्रश्न अधिकाधिक उसवत का गेले? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचं काम अभ्यासकांनी करायला हवं होतं. पण तसे झाले नाही. महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या पातळीवर लोककलांचा जो अभ्यास व्हायला हवा होता तसा तो झाला नाही. आणि आजही होत नाही. केवळ भाषिक अभ्यास आणि उत्सवप्रिय उदात्तीकरणाच्या नादात लोककलांवरील संशोधनातले समाजभान डिलिट होत गेले. म्हणून लोककलांवरील संशोधन समाजशास्त्रीय दृष्टीने व्हायला हवे. तसे झाले नाही तर त्यातील दमनाच्या, शोषणाच्या आणि जातवर्चस्वाच्या कहाण्या कळणार नाहीत.

लोककलांच्या अधोगतीला केवळ एका घटकाला जवाबदार धरून चालणार नाही. कलावंत, प्रेक्षक, मालक, अभ्यासक, माध्यमे आणि शासन हे सारे घटक थोडे बहुत फरकाने लोककलांच्या दयनीय अवस्थेला जवाबदार आहेत. एक तर बहुतांशी लोककला विधीनाटयाला जोडल्यामुळे त्यातली कला लोप पावली आणि दुसरे म्हणजे आधुनिक माध्यमांचा विस्तार आणि प्रेक्षकांची बदलती अभिरूची या गोष्टींनी लोककलांना सतत अस्थिर ठेवले. गावगाडा व त्यातील ग्रामीण जनजीवनाच्या भावविश्वाशी लोककला समरस झालेल्या आहेत. पण आधुनिकीकरणाच्या येण्याने लोककला आणि लोककलावंतांची जी सैरभर झाली ती टोकदारपणे मांडण्याचे काम अभ्यासक संशोधकांकडून झाले नाही. शासनानेही त्यांना भरीव आधार दिला नाही. सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव आर्थिक दारिद्र्य मानसिक कुचंबना अशा तिहेरी विळख्यात आज लोककलावंत अडकला

आहे. त्यांच्या दर्दभऱ्या जगण्याला जसा जसा आधार मिळेल तस तशा त्यांच्या अभिव्यक्तीतून साकारलेल्या लोककला कला म्हणून सक्षम होणार आहेत. प्रसारमाध्यमांमध्ये लोककलांचे जे चित्र साकारले जाते तेही फारसे वास्तव नाही. विशेषत: इलेक्ट्रॉनिक माध्यमांना लोककलेची न्यूज व्हॅल्यू महत्त्वाची असते. तर प्रिंट मिडियाला लोककलांचा रंजक असतो. अशा वेळी लोककलेच्या कलाप्रसाराचा मूळ हेतू दूर रहातो आणि शृंगारकहाण्या मोठ्या होतात.

जागतिकीकरणात लोककलांचे काय होईल असा प्रश्न आहे. याचे साधे व सरळ उत्तर द्यायचे झाल्यास जागतिकीकरणात लोककला आपला पारंपरिक चेहरा बदलून आधुनिक कलांचे अनुकरण करतील हे उघड आहे. तमाशाचा ऑक्रेस्टा होण्यामागे आर्थिक बदल आहे. आधुनिक वाद्ये, लाईट, संगीत, नृत्ये या गोष्टींचा भपकेबाजपणा तमाशात आला तो केवळ प्रेक्षकांची मागणी म्हणून आला असे नाही तर ग्रामीण तरुणांची अभिरूची बदलणाऱ्या आर्थिक औद्योगिक बदलाचेही कारण आहे. जागतिकीकरणाने जगभरातल्या साऱ्याच कलांचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यामुळे जागतिकीकरणात ज्या लोककला उत्पन्नाला जोडलेल्या आहेत त्या आपला चेहरा बदलून अधिक उत्पन्नाला जोडल्या जाण्याचा प्रयत्न करतील आणि ज्या लोककला समाजातल्या रुढी परंपरांना जोडलेल्या आहेत त्या नामशेष होण्याच्या मार्गाला लागतील असे वाटते. महाराष्ट्रातल्या पिंगळा, 'ललित', 'भारूड', 'जागरण' यासारख्या कितीतरी लोककला आज नामशेष होताना दिसत आहेत. तर 'तमाशा', 'लावणी शो' यासारख्या लोककलांनी मागणी तसा पुरवठा या बाजाराच्या तत्त्वाप्रमाणे आपला पारंपरिक चेहरा बदलून गल्ला भरण्याचे नवे नवे मार्ग निवडले आहेत. त्यामुळे लोकतत्त्वाचा आधार असलेल्या लोक समूहातून अधिष्कृत झालेल्या परंपरांचे वाहक असणाऱ्या लोककला जागतिकीकरणात पारंपरिक अर्थाने टिकणार नाहीत हे उघड आहे. पण त्यांनी का टिकावे? असा प्रतिप्रश्न विचारला तर याचे उत्तर सामाजिकदृष्टीने सकारात्मक देता येत नाही. लोककलांनी सतत आपल्या धर्मविधींना रूढींना आणि कर्मकांडांना प्रमाण मानले त्यामुळे धर्मनिरपेक्ष विज्ञानवादी प्रागतिकदृष्टीने लोककला टिकाव्यात असे कुणाला वाटणार नाही. गावगाड्यात जातीव्यवस्था घट्ट करणाऱ्या सामंती देशीवादी जाणिवांना सांस्कृतिक अर्थाने खतपाणी घालण्याचे काम लोककला करतात हे कसे नाकारता येईल? आपल्या गावात यात्रेला तमाशा आणून महार मांग, कोल्हाट्याच्या महिला नाचवल्याची जातवर्चस्वाची पाटीलकी गावातला मोहरक्या मिरवतोच ना त्यामुळे आपल्या देशीवादी कलांची समाजशास्त्रीय चिकित्सा करून त्यांची प्रागतिक सांस्कृतिक मीमांसा करायला हवी. अन्यथा लोककलांच्या उदात्तीकरणाच्या नादात कलावंतांच्या सावल्या छोटया होतील आणि धर्माच्या सावल्या अधिक मोठया होत जातील. पायात चाळ बांधून घुंगराशी संसार करणाऱ्या बाईचं जिनं लाजीरवानं असतं. तिचा रंगलेला चेहरा साऱ्यांना दिसतो; पण त्यामागची गहिरी वेदना मात्र दिसेनाशी होते. पुरुषी नजरा चुकवत चुकवत ओढयानाल्याला ती आंघोळ करते. मासिक पाळीच्या काळात या बाईला नाचावच लागतं. पुरेशे पैसे नसल्याने कोणतेही आधुनिक साधन ती विकत घेऊ शकत नाही तमाशातल्या बाईला आजारही परवडणारा नसतो. कारण त्या काळातला रोज तमाशाचा मालक तिला सुट्टी देत नाही. एकूणच तिची शारीरिक आणि मानसिक कुचंबना जिवघेणी असते. चाळ बांधलेल्या बाईला हळदी कुंकु अथवा इतर कौटुंबिक समारंभात कुणी बोलवत नाही. लग्न कार्यातही ती क्वचित दिसते. नातेवाईक आणि इतर माणसांकडून तिची नाचणारीन आहे म्हणून अवहेलना होते. तमाशात काम नसते तेव्हा ती मोलमजुरीही करू शकत नाही. एकूणच काय तर कोणतीही सामाजिक प्रतिष्ठा या बाईच्या पदरी नसते. थोडक्यात काय तर असंख्य इंगळ्या ढसाव्यात अशी वेदना घुंगरानं नाचणाऱ्या बाईला दिली. राजकारण आणि तमाशा यांचे नाते नेहमीच संवेदनशील वळणावर उभे असते. गेल्या पंचविस वर्षांत महाराष्ट्रातील मराठा राजकारण तमाशा फडात घुसल्याची उदाहरणे कमी नाहीत संगितबारीत घुंगराच्या तालावर डोलणारे राजकारणी पाहिले की सत्ता संपत्ती आणि तमाशा यांचे

श्रृंगारिक नाते कळाल्याशिवाय रहात नाही. बाई नाचविणे ही प्रतिष्ठा समजणा-या मराठा जातीतील तरुणांची पिढी संपली तर आपल्या वारशाचे काय? या राजकीय विचारातून डान्सबार बंद झाले. उद्या संगितबारी थिएटर्स आणि तमाशा फडांवरही अनेक जाचक नियम लादले जातील. डान्सबार बंदीचा चांगला निर्णय सरकारने घेतला खरा; पण काम नसलेल्या मुलींनी उघडपणे वेश्याव्यवसाय सुरू केला त्याचे काय?

मोठमोठ्या शहरात रेव्ह पाट्र्या आणि रोड डान्सच्या रूपाने पेश होणारी नग्नता कशी थांबवायची? संगितबारी थेटरातली रंगलेली उत्तररात्र कशी रोखायची? हे खरे आजचे प्रश्न आहोत. या कडे अतिशय गांभीर्याने पाहिले गेले पाहिजे. तमाशाबद्दलचा एक गैरसमज आवर्जुन नोंदवायला पाहिजे. डान्सबार संगितबारी लावणी शो आणि तमाशा यात मूलभूत फरक आहे. थोडक्यात शहरात दिसणारे लावणी शो म्हणजे तमाशा नव्हे अर्थात या साऱ्यांच्या प्रभावातून तमाशा सुटला नाही; पण तमाशा ही जशी सामाजिक व सांस्कृतिक कला आहे तशीच ती धार्मिकही आहे म्हणून तमाशा हे लोकरंजनातून प्रबोधन साधण्याचे ते अतिशय प्रभावी माध्यम आहे. यासाठी आज या कलेकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. केवळ तमाशा महोत्सव घेऊन अथवा एखादे पॅकेज जाहीर करून तमाशाचा विकास होईल असे वाटत नाही. यासाठी शासन, तमाशा अभ्यासक तमाशा मालक कलावंत तसेच तमाशा कलावंतांसाठी विविध स्थरांवर काम करणाऱ्या स्वसंसेवी संस्था, प्रसारमाध्यमे या साऱ्यांनी एकत्र येऊन तमाशा विकासाचे नवे मॉडेल तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. राजकारणी तमासगीरांच्या प्रन्नांकडे गांभिर्याने पाहात नाहीत. तमाशा ही उपेक्षितांची कला आहे. पण पुरोगामी म्हणविणारे दलित पुढारी समासगीरांचे प्रश्न आस्थेने मांडत नाहीत. तमाशात वावरणारे मतलबी समाजसेवक आपल्या हिताच्या पलिकडे पहात नाहीत, तमाशा कलावंत व मालकांचे शोषण करून मजले चढवणारे सावकार गावोगावी वाढत आहेत. तमाशाचा अभ्यासही केवळ विद्यापीठीय वर्तुळात अडकलाय आणि प्रसार माध्यमेही तमाशाकडे केवळ रंजक बातमी म्हणून पहातात. अशी आजची तमाशा विकासाची दयनिय अवस्था आहे. तमाजाश नाचणाऱ्या स्त्रियांच्या जाती पाहिल्या तर ठळकपणे काही बाबी पुढे येतात. एकतर तमाशात नाचणाऱ्या स्त्रिया महार, मांग डोंबारी आणि विशेषत: कोल्हाटी जातीतील आहेत. या साऱ्या गावकुसाबाहेरच्या जाती आहेत गावगाडयातील पारंपरिक कामे संपुष्टात आल्यानंतर या जातींनी उदरनिर्वाहासाठी या कलेचा आधार घेतला. महारांनी गायचे मातंगांनी वाजवायचे आणि कोल्हाटी स्त्रीने नाचायचे, असा जातीय स्तर तमाशात आजही पहायला मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली जातीची तमाशात उतरंड तमाशात आजही पहायला मिळते. तमाशाचा मालक मराठा, गायला महार, वाजवायला मांग, नाचायला कोल्हाटी, कामे करायला आदिवासींची मुले असा हा जातीचा स्तर आहे.

तमाशा ही कला ख-या अर्थाने दलित उपेक्षितांनी विकासित केलेली कला आहे. पण आज ही पारंपरिक लोककला किती दिवस टिकवायची हा मुख्य प्रश्न आहे. कारण बाई नाचवणे आणि पैसे फेकून तिला नागवणं अशी सरंजामी मानसिकता इथल्या सवर्ण जातीने सतत बाळगली. म्हणूनच तमाशात नाचणाऱ्या बाईच्या पायातील घुंगरांना प्रतिष्ठा मिळण्याऐवजी तिचा बाजारच मांडला गेला. आज कला म्हणून तमाशा किती उरला आणि व्यवसाय म्हणून कुठे चालला आहे. हे आजचे चिंतेचे विषय आहेत. या सर्व प्रश्नांकडे समाजशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्याशिवाय याचे आकलन नीट होणार नाही, असे मला वाटले. तमाशाची जातीव्यवस्था त्याचे अर्थकारण तमाशाचा भौगोलिक विचार तमाशा कलावंतांचे जीवन आणि त्यांच्या आरोग्याचे प्रश्न हे सारे समजून घेतल्या नंतर तमाशा पारंपरिक अर्थाने टिकून रहावा असा विचार करणे फारसे उचित ठरेल असे मला वाटत नाही. जागतिकीकरण ही आता अपरिहार्य गोष्ट झाली आहे हे आता आपण मान्य करू लागलो आहोत. माणसाच्या जगण्याचे संदर्भ जसे जसे बदलू लागले आहेत तसे तसे त्याचे सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय संदर्भही बदलू लागले आहेत.

लोककलांच्या बाबतीत हा बदलता सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेण्यासारखा आहे. जागतिकीकरण ही गोष्ट एकटी येणारी नाही तर ती आपल्या सोबत साऱ्या आर्थिक बदलांना कवेत घेऊन येणारी गोष्ट आहे; आणि या अर्थकारणाच्या मुळाशी सा-या माणसाचे जीवनमान अवलंबून असते. आपल्या सांस्कृतिक कलांमध्ये होणारा बदल हा असा अर्थकारणाशी जोडला गेलेला आहे हेही लक्षात घ्यावे लागेल. जागतिकीकरणात सारे सांस्कृतिक संदर्भ बदलले आहेत. स्त्री आणि तिचे लैंगिक शोषण हा सर्वत्र कलांचा प्रमुख विषय बनला आहे. चित्रपटतील नग्नता आपण अनुभवतो आहोतच मागील वर्षी मल्लीका शेरावतने 31 डिसेंबरला केलेले उत्थान नृत्य आपण विसरलो नाही. दूरदर्शन मालिकांवरही शरीरसंबंध हाच मुख्य विषय असतो अगदी ब्लेडच्या जाहिरातीतसुध्दा आपल्याला स्त्री दिसते. हे झाले प्रतिदीत व नावाजलेल्या स्त्रियांबद्दल तमाशातल्या बाईची अवस्था तर यापेक्षा भयानक आहे. पुरोगामी महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास असं सांगतो की, तमाशातली बाई नाचविणे हे इथल्या मराठा पाटलाने सतत प्रतिष्ठेचे मानले आहे. गावातल्या यात्रेला तमाशा ठरवायला पाटील जातो. गावात तमाशा आणून वाईला नाचविली या त्याच्या सरंजामी मानसिकतेने तमाशा कलेला कला म्हणून संपविले. तिचे बाजारूकरण केले आहे.

### तमाशापुढील आजचे प्रश्न

तमाशाचे अर्थकारण सावकारशाही शासनाकडून होणारे दुर्लक्ष कालवतांचे जगण्याचे प्रश्न त्यांच्या आरोग्याचे प्रश्न चित्रपटाच्या वाढत्या प्रभावातून तमाशाचे होणारे बाजारीकरण व्यसनाधीनता, वाढती अनैतिकता यासारखे अनेक प्रश्न आज तमाशाला भेडसावणारे आहेत. तमाशाचे होणारे ऑर्केस्ट्रीकरण हा तर आर्थिक बदलाचा ठळक दिसावा असा परिणाम आहे आधुनिक वाद्ये, लाईट डेकोरेशन आणि झगमगते स्टेज व चित्रपटाप्रमाणे नृत्यांचे सादरीकरण या सगळ्या गोष्टी तमाशाला परंपरेपासून कितीतरी दूर घेऊन चालल्या आहेत. या बदलाकडे केवळ एकांगी दृष्टीने पहाणे उचित होणार नाही कारण काळाच्या प्रवाहात आणि बदलत्या सांस्कृतिक संदर्भात चित्रपट नाटक दूरदर्शनवरील मनोरंजनाचे कार्यक्रम बदललेले नाहीत कारण तमाशात होणारा हा बदल आपरिहार्य आहे. त्याला थांबविणे आपल्या हातात नाही. आपण फक्त येवढेच करू शकातो की तमाशा कलेत जो बदल होत आहे तो कितपत सामाजिक हीत साधणारा आहे हे पहाणे गरजेचे आहे. तमाशा जर मनोरंजनातून प्रबोधन करणारा कला प्रकार आहे असे जर आपण म्हटले तर त्याला समाजपरिवर्तनासाठी व प्रबोधनासाठी सज्ज करणे हे अभ्यासक संशोधक आणि तमाशाचा विकास करू पहाणा-या प्रत्येक व्यक्तीचे काम आहे असे मला वाटते. थोडक्यात तमाशाला पुरोगामी चेहरा देऊन त्याला परिवर्तनासाठी सज्ज करणे ही आजची सांस्कृतिक गरज आहे.

### संदर्भ :

१. व्यवहारे शरद, लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती. जून २००२.
२. किशोर शांताबाई काळे, 'कोल्हाट्याचे पोर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, नोव्हेंबर १९९४.
३. व्हटकर नामदेव, मराठीचे लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य, यशत्री प्रकाशन, कोल्हापूर. प्रथमावृत्ती १९७५.
४. प्रा. डॉ. कसबे मिलिंद, तमाशा कला आणि कलावंत, सुगावा प्रकाशन पुणे, २००७.